## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :७२३/२०२१/जळगांव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. भुषण प्रभाकर निकम,<br>रा. मु.पो. धामणगाव, ता.चाळीसगाव,<br>जि.जळगांव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,<br>धामणगांव, ता.चाळीसगाव,जि.जळगांव. |

**सुनावणी दिनांक ३०/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३०/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार वस्तुस्थितीदर्शक नसलेली व अपुर्ण माहिती दिलेली आहे.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक द्वितीय अपील क्रमांक २६७३/२०१८/जळगांव वरील निर्णय दिनांक ०६/०९/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धामणगांव, श्री. योगेश एकनाथ खलाणे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७/०५/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगासमोर उपलब्ध असलेली कादपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपील क्रमांक २६७३/२०१८/जळगांव संदर्भात दिनांक ०६/०९/२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार तक्रारदार यांना दि. ०८/१०/२०२१ रोजी वस्तुस्थितीदर्शक उपलब्ध अभिलेखानुसार २९२ पानांची माहिती रजिस्टर पोस्टाने पुरविलेली आहे. सुनावणीवेळी तक्रारदार यांनी कोणती माहिती अपूर्ण आहे याबाबत काहीही सांगितले नाही. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ७२३/२०२१/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** - अ्ते·५६० 28 MAR 2024